# विधानभवन ते चर्चगेट बोगद्याचे काम पूर्ण

## मेट्रो-३ मार्गिकेचा एकोणिसावा टप्पा पार

**मुंबई : प्रतिनिधी**

मेट्रो-३ या कुलाबा-वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो कामाला चांगलाच वेग आला आहे. गुरुवारी यातील एकोणिसाव्या बोगद्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सूर्या-१ या टीबीएम मशीनने विधानभवन ते चर्चगेट स्थानकादरम्यानचे ४९९ किमीचे भुयारीकरण तब्बल ९० दिवसांत पूर्ण केले आहे. सूर्या-१ हे वैतरणा-१ आणि वैनगंगा-१ यानंतर मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम पूर्ण करणारे तिसरे टीबीएम ठरले आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्ण मार्गिकेचे एकूण ५५ किमी भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे प्रगतिपथावर आहे. आतापर्यंत ३२ किमी मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे काम तब्बल १७ टीबीएमच्या साहाय्याने सुरू असून ही टीबीएम जमिनीत उतरवण्यासाठी मुंबईतील कफ परेड, इरॉस, आझाद मैदान, सायन म्युझियम, सिद्धिविनायक मंदिर, नया नगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारीपुत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे शाफ्ट तयार केले आहेत.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो-३ मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंत ३.८१२४ किमी भुयारीकरण गेल्या महिन्यामध्येच पूर्ण झाले. त्यामुळे डाऊनलाईन बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पातील वैतरणा ही पहिली टीबीएम मशिन ठरली. केवळ २० महिन्यांत वैतारणा-१ या टनेल बोअरिंग मशिनने हा महत्त्वपूर्ण पल्ला गाठला होता. या प्रकल्पाचे काम एकूण सात भागांमध्ये विभागले आहे. सिद्धिविनायक ते धारावीदरम्यान सर्वात मोठा टप्पा आहे. यात ११.०२ किमीच्या भुयारीकरणापैकी ६.८९ किमी भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे, तर कफ परेड ते सीएसटी या पहिल्या पॅकेजमधील ५.८९ किमीपैकी ३.२१ किमीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे.